
शनिवार, ९ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ८२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अफगाणिस्तानमध्ये मशिदीत बॉम्बस्फोट; ५० जणांचा मृत्यू



**काबूल :** अफगाणिस्तानच्या कुंडुझ शहरातील शिया मशिदीमध्ये शुक्रवारी (दि. ८) मोठा बॉम्बहल्ला झाला. या हल्ल्यात ५० लोक ठार झाले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अमेरिकन सैन्याने हा देश सोडल्यापासून झालेल्या आतापर्यंतच्या हल्ल्यांमधील हा एक मोठा हल्ला आहे. अफगाणिस्तानला तालिबानच्या ताब्यात आल्यानंतर होणाऱ्या वेगवेगळ्या हल्ल्यांमुळे अफगाणिस्तान दिवसेंदिवस अस्थिर होत जात असल्याचे दिसते आहे. कुंदुज रुग्णालयातून मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ५०पेक्षा जास्त जखमींना रुग्णालयात आणण्यात आले असून ३५ लोकांचा मृत्यू झाला आहे. डॉक्टर्स विदाउट बॉर्डर रुग्णालयातील एका कामगाराने १५ मृत आणि अनेक जखमी रुग्णालयात भरती झाल्याची माहिती दिली आहे. वेगवेगळ्या वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेतील मृतांचा आकडा १००वर जाण्याची शक्यता आहे.


**अंतरंग**

पनवेल महापालिकेतर्फे लस आपल्या दारी!/३

अलिबागमध्ये एकाच दिवशी तीन ठिकाणी घरफोडी/५

विजयानंतरही पंजाब आयपीएलमधून बाहेर/६


# वसुली आली की ‘ससा’ होतो आणि शेतकऱ्यांना मदत म्हटली की ‘कासव’!

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांचा महाविकास आघाडी सरकारवर हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अतिवृष्टीमुळे व पुराने नुकसान झालेल्या बहुतांश शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत शासकीय मदत पोहचलेली नाही. यावरून विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारवर टीका केली आहे. या सरकारमध्ये चाललेय तरी काय विदर्भ आणि मराठवाड्यात अतिवृष्टी आणि पुराने बाधित शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा आहे. वसुली आली की या सरकारचा ‘ससा’ होतो आणि शेतकऱ्यांना मदत म्हटली की ‘कासव’, अशा शब्दांत फडणवीस यांनी निशाणा साधला आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी पुढे ट्विटमध्ये म्हटले की, मार्च, एप्रिल, मे २०२१मध्ये अतिवृष्टी झाली, तर मदतीचा जीआर ६ ऑक्टोबर २०२१ रोजी, जुलै महिन्यात अतिवृष्टी झाली तर मदतीची प्रेसनोट ७ ऑक्टोबर २०२१ रोजी. सहा–आठ महिने मदतीचे आदेश जर निघत नसतील तर प्रत्यक्ष मदत केव्हा पोहचणार? ‘वसुली’साठी धावणारे सरकार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी का असे धडपडतेय? विदर्भ आणि मराठवाड्याच्या अतिवृष्टी, पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आणि भरीव मदत जाहीर झालीच पाहिजे. एकरी ५० हजारांची मागणी करणारे आता हात का आखडता घेताहेत, असा सवालही फडणवीस यांनी केला आहे.



मदतीचे आकडे तर त्याहून संतापजनक असे सांगत मार्च ते मे २०२१ : संपूर्ण रत्नागिरी जिल्हा ५.१० लाख, सिंधुदुर्ग जिल्हा २४ लाख, परभणी जिल्हा २५ लाख, हिंगोली १४ लाख, नांदेड २० लाख, उस्मानाबाद १.७४ लाख, यवतमाळ १० लाख, नागपूर २३ लाख, वर्धा ३९ लाख, गोंदिया २६ लाख, चंद्रपूर ३५ लाख रुपये फक्त, अशी आकडेवारीच फडणवीसांनी दिली आहे.

### शेतकऱ्यांप्रति ‘नक्राश्रू’ ढाळणारे आता बंद पुकारतील काय?

फडणवीस यांनी आणखी एका ट्विटमध्ये जुलै २०२१च्या मदतीची भरघोस घोषणा, अशी खोचक टिप्पणी करीत नागपूर विभागातील सहा जिल्हे मिळून फक्त १० कोटी रुपये आणि संपूर्ण नाशिक विभागातील सर्व पाच जिल्हे मिळून फक्त एक लाख रुपये! म्हणजे एक जिल्हा फक्त २० हजार रुपये! शेतकऱ्यांप्रति ‘नक्राश्रू’ ढाळणारे ‘महाविकास’ नेते आता बंद पुकारतील काय, असा सवाल केला आहे.





# भाजपचा कार्यकर्ता म्हणून अधिक सक्षमपणे काम करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल शहर बूथ क्रमांक ४११ची बैठक आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचा सन्मान सोहळा गुरुवारी (दि. ७) आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी त्यांनी भाजपचा कार्यकर्ता म्हणून अधिक सक्षमपणे काम करण्यासाठी सज्ज होऊया, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष सुनील घरत, शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, प्रभाग समिती ‘ड’ सभापती सुशीला घरत, सरचिटणीस अमरीश मोकल, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, जिल्हा अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष तथा नगरसेवक प्रकाश बिनेदार, नगरसेविका वृषाली वाघमारे, वॉर्ड अध्यक्ष विजय म्हात्रे, भाजप नेते जगदिश घरत, जितेंद्र वाघमारे, बूथ अध्यक्ष किशोर वाहुळकर, गौरी पवार, चंद्रकांत मंजुळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्तीकेंद्र प्रमुख उपस्थित होते. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

आकुर्ली येथेही बूथ क्रमांक ५३६ची बुथ कमिटी बैठक भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. विठ्ठल मंदिरात झालेल्या या बैठकीला जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, आकुर्लीचे सरपंच सचिन पाटील, उपसरपंच सत्यवान धर्णेकर, माजी सरपंच पद्माकरबुवा पाटील, ज्येष्ठ नेते सदाशेठ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# जेएनपीटी बंदरातून १२५ कोटींचे हेरॉईन जप्त

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

प्रवासी जहाजावर अमली पदार्थ (ड्रग्ज) घेऊन गेल्याप्रकरणी केंद्रीय अमली पदार्थविरोधी पथकाने (एनसीबी) केलेली कारवाई ताजी असतानाच, उरणमधील जेएनपीटी बंदर परिसरातील एका कंटेनर यार्डमधून तब्बल १२५ कोटींचे हेरॉईन जप्त करण्यात आले आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकाने (डीआरआय) ही कारवाई केली. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### व्यावसायिक अटकेत

मिळालेल्या माहितीनुसार जेएनपीटी बंदरातील एका कंटेनरमधून २५ किलोंहून अधिक हेरॉईन जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी एका व्यावसायिकाला अटक करण्यात आली आहे. जयेश संघवी (वय ६२, रा. नवी मुंबई) असे या व्यावसायिकाचे नाव असून तो इराणमधून शेंगदाणा तेलाच्या खेपेत हेरॉईनची तस्करी करीत होता. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी जेएनपीटी येथे इराणहून आलेला एक कंटेनर ताब्यात घेतला आणि ४ ऑक्टोबर रोजी त्याचा शोध घेतला. या व्यावसायिकाला ११ ऑक्टोबरपर्यंत कोठडी सुनावण्यात आली असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## आर्यन खानचा जामीन अर्ज फेटाळला

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रूज पार्टीमध्ये ड्रग्जच्या प्रकरणामुळे अटकेत असलेला बॉलीवूड अभिनेता शाहरूख खानचा मुलगा आर्यनसह अरबाज मर्चंट आणि मुनमुन धामेचा यांचे जामीन अर्ज शुक्रवारी (दि. ८) मुंबईच्या किल्ला न्यायालयाने फेटाळले. त्यामुळे आर्यन आणि इतर सर्व आरोपींना तुरुंगात रहावे लागणार आहे.

## निवडक

### रिझर्व्ह बँकेचे पतधोरण जाहीर; व्याजदर जैसे थे!

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय)ने रेपो रेट (४ टक्के) आणि रिव्हर्स रेपो रेट (३.३५ टक्के) अर्थात व्याजदर जैसे थे ठेवले आहेत. आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी पतधोरण समितीच्या द्विमासिक आढावा बैठकीनंतर हा निर्णय जाहीर केला. दरम्यान, देशाचा विकासदर चालू आर्थिक वर्षात अर्थात ९.५ टक्क्यांवर राहील, असा अंदाज दास यांनी वर्तवला आहे.

### दोन पत्रकारांना शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर



**स्वीडन :** जगात अत्यंत प्रतिष्ठेचे समजल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्कारांची विविध क्षेत्रांसाठी घोषणा केली जात आहे. यातील शांतता पुरस्कार शुक्रवारी (दि. ८) जाहीर झाला असून यासाठी फिलिपीन्स देशाच्या मरिया रेस्सा आणि रशियाचे दिमित्री मुराटोव या दोन पत्रकारांची निवड करण्यात आली आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते

# शिवाजीनगरमध्ये श्रीगणेश, जरी मरी माता मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील श्री जरी मरी माता मंदिर (मठ)मधील श्रीगणेश व श्री जरी मरी माता मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा ७ आणि ८ ऑक्टोबरला साजरा झाला. त्या अंतर्गत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि श्री पिरयोगी गणेशनाथ यांच्या हस्ते श्रीगणेश व श्री जरी मरी मातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

या सोहळ्याला शिवाजीनगर गाव अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा पनवेल तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊ कडू, गजानन ठाकूर, किशोर ठाकूर, अमित कडू, जितेंद्र कडू, जरी मरी मित्र मंडळाचे अध्यक्ष विनोद कडू, वैभव ठाकूर, सुजीत ठाकूर, नंदा ठाकूर, विक्रम ठाकूर, मनीषा ठाकूर, विजय ठाकूर, कुसूम ठाकूर, विनंती ठाकूर, सुदीप ठाकूर, शशिकांत ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, गुंजाबाई ठाकूर, व्ही. के. ठाकूर, रतन ठाकूर, प्रल्हाद ठाकूर, आशा म्हात्रे, गजानन ठाकूर, किशोर ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यातून साकारलेल्या

# कळंबोलीतील कोविड केंद्राचे लोकार्पण

**पनवेल : प्रतिनिधी**

भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यातून कळंबोली येथे सिडकोच्या वतीने साकारण्यात आलेल्या कोविड आरोग्य केंद्रांचे लोकार्पण शुक्रवारी (दि. ८) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते व्हर्च्युअल पद्धतीने करण्यात आले.



या कार्यक्रमास नगर विकासमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, पनवेलच्या महापौर कविता चौतमोल, खासदार श्रीरंग बारणे, खासदार मनोज कोटक, आमदार प्रशांत ठाकूर, सुनील राऊत, मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बालसिंह चहल, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी, सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे आदी डिजिटल माध्यमाद्वारे उपस्थित होते. या वेळी मुंबईतील कांजूरमार्ग येथील कोविड आरोग्य केंद्राचेही लोकार्पण झाले.

कळंबोलीतील कोविड आरोग्य केंद्र कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या गोडाऊनमध्ये केंद्रात उभारण्यात आले असून ते पूर्णपणे वातानुकूलित आहे. यामध्ये एकूण ६३५ खाटा आहेत. त्यात ५०५ ऑक्सिजनयुक्त खाटा, १२५ आयसीयू खाटा (यातील २५ आयसीयू खाटा लहान मुलांसाठी समर्पित आहेत), पाच खाटा या आपत्कालीन कक्षासाठी राखीव आहेत. याशिवाय अन्य कक्ष व सुविधा आहेत.

# चिपी विमानतळ उद्घाटनाच्या जाहीर सभेत भांडाफोड करणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

चिपी विमानतळाचे शनिवारी (दि. ९) उद्घाटन होत असताना सिंधुदुर्गाच्या विकासाच्या आड येणाऱ्यांचा या वेळी जाहीर सभेत भांडाफोड करणार असल्याचा इशारा केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणे यांनी दिला आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी सत्ताधारी शिवसेना आणि शिवसेनेचे सिंधुदुर्गातील खासदार विनायक राऊत यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली.




**केंद्रीय मंत्री राणेंचा इशारा**

राणे म्हणाले, २०१४ साली मी विमानतळ बांधून पूर्ण केले, पण आता तेच पुढे राहून म्हणतायत आम्ही विमानतळ आणले. मी जी विकासकामे सिंधुदुर्गात आणली, त्या सगळ्याला शिवसेनेने विरोध केला. आता मात्र सांगतात आम्हीच केले. कावकाव करून काही मिळत नाही.

### शिवसेनेची हफ्तेबाजी सुरूच

सिंधुदुर्गात शिवसेनेची हफ्तेबाजी सुरू असल्याची टीका या वेळी नारायण राणेंनी केली. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा सिंधुदुर्गातील उद्योगपतींना फार त्रास आहे. गाडी घेऊन दिल्याशिवाय त्यांनी रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरू करू दिले नाही. उद्या जाहीर सभेत सगळ्यांची नावे मी सांगणार आहे. विकासाच्या आड येणारी ही लोकं आहेत. त्यांचा भांडाफोड करणार, असेही राणे म्हणाले.



पनवेल भाजपतर्फे
**जनहितार्थ**
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. ९ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे**

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी–२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १५. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १६. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- १. तक्का पमपा शाळा ▪ २. कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह ▪ ३. आसूडगाव, रा.जि.प. शाळा
- ४. जुई गाव, रा.जि.प. शाळा ▪ सिद्धी करवले, रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**
**(वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)**

# स्थानिक ट्रेलर वाहतूकदारांना हक्क मिळवून देणार -आमदार महेश बालदी

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन भाजप वाहतूक सेलतर्फे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर घरत यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत स्थानिक ट्रेलर वाहतूकदारांना सीएफएसमध्ये ४० टक्के वाहतुकीचा व्यवसाय मिळावा याकरिता सहकार्य करावे, असे निवेदन दिले. या वेळी आमदार महेश बालदी यांनी स्थानिक ट्रेलर वाहतूकदारांना त्यांचे हक्क मिळवून देणार असल्याचे आश्वासन दिले.



आमदार महेश बालदी म्हणाले की, मी तुम्हा स्थानिक ट्रेलर वाहतूकदारांच्या १०० टक्के ठामपणे पाठीशी आहे. तुमची ४० टक्के वाहतुकीचा व्यवसाय मिळावा ही मागणी नसून हा तुमचा हक्क आहे. तुमचा हक्क तुम्हाला मिळवून देणे ही माझी जबाबदारी आहे. येत्या आठ दिवसांत सीएफएस असोसिएशनसोबत तुमची चर्चा घडवून आणेन. जर चर्चेतून मार्ग निघाला नाही तर रस्त्यावर आंदोलन करावे लागले तर आंदोलनाचे नेतृत्व मी स्वतः करेन, तुम्ही निश्चिंत रहा, असा ठाम विश्वास सर्व स्थानिक ट्रेलर वाहतूकदारांना दिला.

तरुणांनी नोकऱ्या न मिळाल्याने वाहतूक व्यवसाय सुरू केला. त्यांना जर त्यांचे हक्क मिळत नसतील, त्यांच्यावर अन्याय होत असेल तर तो दूर करण्याची जबाबदारी मी घेतो. तरुणांना पुन्हा बेरोजगार होऊ देणार नाही. स्थानिक व प्रकल्पग्रस्तांना प्रत्येक उद्योगधंद्यात प्राधान्याने नोकरी व व्यवसायात प्राधान्य मिळायलाच पाहिजे, अशी परखड भूमिका आमदार महेश बालदी यांनी जाहीर केली.

या वेळी भाजप वाहतूक सेल जिल्हाध्यक्ष सुधीर घरत यांच्यासमवेत भाजप जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, कामगार नेते सुरेश पाटील, तालुका सरचिटणीस दीपक भोईर, वाहतूक सेल उरण तालुका अध्यक्ष जितू ठाकूर तसेच स्थानिक वाहतूकदार योगेश पाटील, निशिकांत सुतार, राजकुमार कडू, किशोर तांडेल, अनिल पाटील, नितेश ठाकूर, सतीश तांडेल, पराग भोईर, शैलेश गावंड, नितीन पाटील व अन्य सहकारी उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कामोठ्यात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मानवता सेवा प्रतिष्ठान व अपंग क्रांती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे कामोठे येथे शुक्रवारी (दि. ८) आयोजन करण्यात आले होते. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते 'रयत'च्या कोमोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या आवारात वृक्षारोपण करून या कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मानवता सेवा प्रतिष्ठान व अपंग क्रांती संघटनेच्या माध्यमातून चांगले काम सुरू असून, तुमची जीद्द अशीच कायम ठेवा, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला न्यू इंग्लिश स्कूलचे व्हाईस चेअरमन सुधाकर पाटील, मानवता सेवा प्रतिष्ठान व अपंग क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बी. जी. पाटील, कार्यकारी अध्यक्ष किशोर पाटील, निवृत्त प्राध्यापक राजाराम पाटील, पनवेल मंडल अधिकारी संतोष पाटील, जिल्हा महिला सदस्या श्रद्धा पाटील, लीना चिंबूळकर, रायगड जिल्हाध्यक्ष विलास फडके, उपाध्यक्ष बाळराम रोडपालकर, सचिव राजाराम गोरे, विनोद देवकर, दत्तात्रय पाटील, अतुल रायबोले, रोशन एंजल, अनिल गोवारी, कुलदीप तांबे, उज्वला नलावडे, विलास ठाकूर, प्रसिद्धी प्रमुख रवींद्र राठोड, महिला संघटक अनिता मसुंदे, सल्लागार सुरेश वाशीकर, संदेश दलाल, उषा अहिरे, कवी पाटील, खगेश्वर मोहंती आदी उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते 'वस्त्र विविधा'चे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्बल ऑफ पनवेल सिम्फनीच्या माध्यमातून पनवेल शहरातील कश्यप हॉलमध्ये 'वस्त्र विविधा' या साड्यांचे भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन केले आहे. तीन दिवसीय आयोजीत या प्रदर्शनाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ८) झाले.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोटरीमार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले. पनवेल शहरातील टिळक रोड येथील काश्यप हॉलमध्ये रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्फनीच्यावतीने 'वस्त्र विविधा' हा आकर्षक अश्या साड्यांच्या भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन केले आहे. हे प्रदर्शन ८ ते १० ऑक्टोबरदरम्यान सुरू राहणार आहे.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका रूचिता लोंढे, रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्फनीचे अध्यक्ष गणेश देवळे, सेक्रेटरी योगिता देशमुख, खजिनदार श्रीपाद वैशंपायन आदी उपस्थित होते.

# कामोठ्यात शासकीय दाखले वाटप शिबिर

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या मागणीनुसार कामोठे यथील सुषमा पाटील विद्यालयात शुक्रवारी (दि. ८) शासकीय दाखले वाटप शिबिर झाले. कोरोना नियमांचे पालन करून झालेल्या या शिबिराचा अनेक नागरिकांनी लाभ घेत उदंड प्रतिसाद दिला. या शिबिराला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली.

**गव्हाण येथील छत्रपती शिवाजी हायस्कुलमध्ये मंगळवारी (दि. १२) सकाळी ११ वाजता दाखले वाटप शिबिर होणार आहे. या शिबिरामध्ये रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला, डोमिसाईल, वय व अधिवास दाखला, रहिवासी दाखला, जातीचा दाखला, शालेय विद्यार्थ्यांसाठी आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती आदी सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहेत.**



रेशनकार्ड, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, डोमिसाईल, आधारकार्ड, वय व अधिवास अशा विविध शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांना पनवेल तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात. यामुळे वेळ आणि आर्थिक भुर्दंड पडत असतो. त्यामुळे नागरिकांचा हा त्रास वाचविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व बबन मुकादम यांनी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांची भेट घेऊन शासकीय दाखले वाटप शिबिर आयोजित करण्याची मागणी केली होती. त्या मागणीनुसार ग्रामीण व शहरी भागात सहा ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने खारघर, सुकापूर, कळंबोली, आजिवली आणि कामोठे येथे दाखले वाटप शिबिर पार पडले.

या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, गोपीनाथ भगत, नगरसेविका अरुणा भगत, हेमलता गोवारी, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवि जोशी, भाजप नेते प्रदिप भगत, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील, युवा मोर्चा पनवेल तालुका अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपतर्फे स्वच्छता अभियान आणि गरजूंना धान्यवाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून भाजपच्या माध्यमातून सेवा व समर्पण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत भाजप पनवेल तालुका मंडलच्या वतीने आकुर्ली आणि पाली देवद येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले तसेच धामणी येथील आदीवासीवाडीमध्ये धान्यवाटप करण्यात आले. भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत हे कार्यक्रम झाले.


भाजपच्या माध्यमातून देशभरात सेवा व समर्पण अभियानाअंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत भाजप पनवेल तालुका मंडळाच्या वतीने आकुर्ली आणि पालीदेवद येथील गणपती विसर्जन घाटांवर स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच या उपक्रमाअंतर्गत धामणी येथील आदीवासीवाडीतील नागरिकांना धान्यवाटप करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील, युवा मोर्चा ग्रामीण अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पालीदेवद आणि आकुर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच, सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोदी, भुजबळ मळा व आदिवासी वाडीवर लसीकरण


**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत राबविण्यात येणाऱ्या खास लसीकरण मोहिमेंतर्गत शुक्रवारी (दि. ८) प्रभाग २०मधील पोदी, भुजबळ मळा व आदिवासी वाडीवर नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्या मागणीप्रमाणे लसीकरण करण्यात आले.



कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्यात मिशन कवच कुंडलची घोषणा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ८ ते १५ ऑक्टोबरदरम्यान खास लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. पनवेल महापालिकेनेही या मोहिमेअंतर्गत १०० टक्के नागरिकांचा पहिला डोसचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्या मागणीप्रमाणे प्रभाग २० मधील पोदी, भुजबळ मळा व सेक्टर १६ जवळील आदिवासी वाडीवर जाऊन तेथील नागारिकांना लसीकरण करण्यात आले.

या वेळी प्रभाग २०चे नगरसेवक तेजस कांडपिळे तसेच समीर मोरे, रणजीत येरूणकर, आनंद भुजबळ, हरिश्चंद्र भुजबळ, हरेश भुजबळ, गणेश नाईक, विशाल सावंत, डॉक्टर आणी मेडिकल स्टाफ उपस्थित होता.



**पनवेल : नगरसेविका दर्शना भोईर यांच्या प्रयत्नाने शहरातील विसावा हॉटेल ते जयभारत नाका येथील ड्रेनेजवर नवीन झाकणे बसविण्यात आली.**



**उलवे नोड : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि तमीळ संगम यांच्या संयुक्त विद्यमान सेक्टर १९मध्ये आयोजित नवरात्रोत्सवास भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. सोबत भाजप कार्यकर्ता मंगेश म्हात्रे.**



**कळंबोली : त्रिमूर्ती मंदिर एलआयजी १ जे आणि के ओनर्स असोसिएशनच्या वतीने के कंपाऊंडमध्ये कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर शुक्रवारी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांना कोविशिल्ड लसीचा डोस देण्यात आला. या वेळी कळंबोली मंडल सरचिटणीस दिलीप बिष्ट तसेच राजन पिल्लै, डॉ. अनिल पाटील यांचा असोसिएशनचे सेक्रेटरी महेश शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**



**नवीन पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने नवरात्रोत्सवादरम्यान दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी दुर्गामाता दौड ही येथील सेक्टर ७ या ठिकाणी काढण्यात आली होती. त्यास युवकांचा प्रतिसाद लाभल्याचे दिसून आले.**

# नवरात्रोत्सवानिमित्त रिल्स स्पर्धा

**पनवेल :** येथील महापालिकेच्या नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त रिल्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांनी इन्स्टाग्राम या ॲपवरून रिल्स शुट करून त्या ८०८०५७२२२१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवाव्यात. रिल्स पाठविण्याची अंतिम तारीख १५ ऑक्टोबर असून या स्पर्धेत जास्तीत जास्त सहभागी होण्याचे आवाहन नगरसेविका रूचिता लोंढे यांनी केले आहे.

# जेएनपीटीमध्ये विविध स्पर्धा, उपक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत जेएनपीटीमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर विविध स्पर्धांचे आयोजन ही करण्यात आले आहे.



रायगड जिल्ह्यातील चार अनाथाश्रम व वृद्धाश्रमांना विविध प्रकारची मदत केली आहे. अनाथाश्रम व वृद्धाश्रमातील लोकांसाठी जेएनपीटीने सिमेंट काँक्रीटचे बेंच, सिटिंग मॅट, पिण्याच्या पाण्याचे वॉटर कूलर आणि इन्व्हर्टरसारख्या विविध गरजेच्या वस्तूंची मदत केली आहे. देशाची महान संस्कृती आणि गौरवशाली इतिहास यावर प्रकाश टाकणाऱ्या विषयांवर आधारित निबंध लेखन, गायन आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. तसेच, जेएनपीटीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या प्रगतीचे स्मरण करण्यासाठी ७५ ची मानवी आकृती तयार करून राष्ट्रगीत गायले. याचाच एक भाग म्हणून एक योग सत्रही आयोजित केले गेले. यासोबतच स्वच्छ भारत अभियानाचा प्रचार-प्रसार करुन त्यास चालना देण्यासाठी बंदर परिसरात स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणारे फलक आणि बॅनर लावण्यात आले आहेत. जेएनपीटीचे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी स्वच्छता अभियान व वृक्षारोपण मोहिमेमध्ये सुद्धा सक्रियपणे भाग घेतला.

पुढील महिन्यांत स्वातंत्र्याचा का अमृत महोत्सवांतर्गत रायगड जिल्ह्यातील वंचित मुलांना मदत, त्यांच्यासाठी आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिरे, परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करण्याचा जेएनपीटीचा मानस आहे. याशिवाय बंदर परिसरातील लोकांसाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर व तज्ञ व्यक्तींची प्रेरणादायी व्याख्याने, करिअर मार्गदर्शन, आहार जागरूकता, स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याची सुद्धा जेएनपीटीची योजना आहे.

हे राष्ट्रव्यापी अभियान यशस्वी करण्यासाठी आम्ही आमचे कर्मचारी व भागधारकांसह सक्रिय योगदान देत राहू, असे जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी याबद्दलची प्रतिक्रिया देताना सांगितले.

## निवडक

### कर्करोगविषयक ऑनलाइन व्याख्यानमाला

**पनवेल :** पर्यावरणीय घटक, बदलती जीवनशैली या आणि अशा अनेक बाबींमुळे कर्करोगाचे प्रमाण वाढते आहे. त्यादृष्टीने समाजात जाणीव-जागृती करण्याच्या उद्देशाने, मराठी विज्ञान परिषदेने ऑक्टोबर महिन्यात कर्करोगविषयक ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. शनिवारी (दि. १०) सायंकाळी ५ ते ६ या वेळेत होणाऱ्या दुसऱ्या व्याख्यानात, डॉ. रजनी भिसे स्तनाच्या कर्करोगाविषयी मार्गदर्शन करणार असून, ते व्याख्यान मराठीतून होईल. विनामूल्य असलेल्या या व्याख्यानमालेच्या नोंदणीकरिता officemavipamumbai.org या लिंकवर जाऊन संपर्क साधवा.



**भाजप नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री, शेतकरी नेते सदाभाऊ खोत यांची पनवेलच्या पत्रकारांनी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली. या वेळी पत्रकार प्रशांत कदम, संदीप राजगोळकर, गणेश कोळी, रत्नाकर पाटील, संजय कदम, हरेश साठे, साहिल रेळेकर, अनिल राय आदी उपस्थित होते.**

## नवी मुंबई महापालिकेची नियोजनबद्ध तयारी

# नवी मुंबईत बेड्स, ऑक्सिजनचा साठा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोरोनानी संभाव्य तिसरी लाट येणार अशी शक्यता वर्तवली जात असल्याने नवी मुंबई पालिकेने जय्यत तयारी केलेली आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत तिसरी लाट येण्याची शक्यता गृहीत धरून पालिकेने ११ हजार ५४२ रुग्णशय्यांची तयारी ठेवली आहे. याशिवाय नेरूळ येथील प्रयोगशाळेची चाचणी क्षमतादेखील वाढविण्यात आलेली आहे.

(संग्रहित छायाचित्र)



नेरूळ व ऐरोली येथील दोन्ही सार्वजनिक रुग्णालयात अत्यवस्थ रुग्णांसाठी अतिदक्षता कक्ष तयार करण्यात आले आहेत. रुग्णवाहिका व प्राणवायूचा साठा करण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात आलेली आहे. कोरोनाची तिसरी लाट गणेशोत्सव काळात येण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे पालिकेने प्राणवायू, सर्वसाधारण, प्राणवायू आणि अत्यवस्थ रुग्णशय्याची संख्या झपाट्याने वाढवली आहे. काही खासगी इमारती ताब्यात घेऊन त्या ठिकाणी साध्या रुग्णशय्या तयार ठेवण्यात आलेल्या आहेत.

पनवेल येथील इंडिया बुल्स इमारतीतील एक हजार रुग्णशय्या या पूर्वीच तयार आहेत, पण हे केंद्र शहरापासून लांब असल्याने त्यावर टीका केली गेली होती. त्यामुळे हे केंद्र पालिकेने राखीव ठेवले आहे. दिवसाला दोन ते तीन हजार कोरोना रुग्ण बाधित आल्यास त्यांच्या उपचारासाठी व्यवस्था पालिकेने केली असून खासगी रुग्णालयांचे दोन हजार रुग्णशय्या ताब्यात घेण्याची तयारी आहे.

शाळा आणि मंदिरांचे निर्बंध शिथिल झाल्याने कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता राज्याच्या टास्क फोर्सने व्यक्त केली आहे. त्यामुळे पालिकेने पहिल्या व दुसऱ्या लाटेपेक्षा दुप्पट तयारी करून ठेवली आहे. ११ हजार ५४२ रुग्णशय्यांबरोबरच पालिकेने आणखी सहा हजार रुग्णशय्यांची तयारी केली आहे.

## कसळखंडमध्ये आज विविध सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच आमदार महेश बालदी यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन शनिवारी (दि. १०) होणार आहे.

यामध्ये कसळखंड गावापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण (१८ लाख), कसळखंड अंगणवाडी इमारत (आठ लाख ५० हजार), कसळखंड अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (पाच लाख), कसळखंड ते शिवाजीनगर जोडरस्ता (१० लाख), शिवाजीनगर अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (पाच लाख), शिवाजीनगर ते कसळखंड जोडरस्ता (१० लाख), आष्टे स्मशानभुमी रस्त्याचे काँक्रीटीकरण (आठ लाख) या कामांचे भूमिपूजन होणार आहे.

मोहोपाडा येथील आय व्हिजन ऑप्टीक्सच्या सहकार्याने होणारे नेत्र चिकित्सा शिबिर जि. प.च्या कसळखंड येथील शाळेत होणार आहे. घोडीलदेव क्रिकेट संघ कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत.

### आर्थिक मदत व कोविड योद्धा सन्मान

**कसळखंड ग्रामपंचायतीच्या वतीने कोरोनामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबाना आर्थिक मदत व कोरोना काळात समाजासाठी केलेल्या कार्य केलेल्या व्यक्तींचा कोविड योद्धा म्हणून सन्मान शनिवारी (दि.१०) करण्यात येणार आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या कसळखंड येथील शाळेत होणारा हा कार्यक्रम सकाळी ११.३० वाजता होईल. ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील व सर्व ग्रामपंचायत सदस्यांचे या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभणार आहे.**

## पनवेलमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली २ ते १४ ऑक्टोबर या काळात पॅन इंडिया अवेरनेसचे आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने गुरुवारी (दि. ७) पनवेल तहसीलदार कार्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



तालुका विधी सेवा समिती पनवेल अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश पनवेल जिल्हा न्यायालय आर. जी. अस्मर यांच्या माध्यमातून गुरुवारी सकाळी ११ वाजता पनवेल तहसील कार्यालयात 'स्कीम ऑफ लीगल एड सर्व्हिसेस' बाबत 'सिनियर सिटीझन ॲक्ट' या विषयावर ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून पनवेल बार असोसिएशनचे विधिज्ञ अनिल जाधव हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर व प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नागरीक संघटना पनवेल शहरचे अध्यक्ष नंदकुमार जयराम जोशी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ नागरीकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना वक्त्यांनी कायदेशीर माहितीसह उत्तरे दिली. या शिबिरास प्रचंड प्रतिसाद लाभला असून मोठया संख्येने पुरूष व महिला जेष्ठ नागरीक यांनी उपस्थित राहून जेष्ठ नागरीकांचे हक्क व अधिकार याविषयी माहिती प्राप्त करून घेतली.

## स्वच्छतादूतांना मोफत धनुर्वात लसीकरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी डॉक्टर असोसिएशनच्या वतीने वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी मोफत धनुर्वात लसीकरण करण्यात आले.

वासांबे (मोहोपाडा) ही तालुक्यातील सर्वांत मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांची लोकसंख्या जवळपास ५७ ते ५८ हजारांच्या आसपास आहे. या ग्रामपंचायतीचा विस्तार मोठा असल्याने परिसराची स्वच्छता करताना सफाई कामगारांना नाकीनऊ येते. यातच परिसरातील बाजारपेठेचे मुख्य केंद्रबिंदू असणाऱ्या मोहोपाडा शहरात आसपासचे नागरिक खरेदी विक्रीसाठी येत आहेत. यातच दुकानदारांकडून मोठ्या प्रमाणात टाकाऊ कचरा गोळा होत आहे. मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीत सफाई कर्मचारी आपल्या जीवाची पर्वा न करता टाकाऊ सर्वप्रकारचा कचरा उचलून काही अंतरावर नेऊन योग्यप्रकारे विल्हेवाट लावत आहेत. या वेळी सफाई काम करताना हाता पायाला इजा होवून आरोग्यावर परिणाम होऊ नये म्हणून हे लसीकरण करण्यात आले.



या वेळी रसायनीतील डॉक्टर असोसिएशनने सफाई कामगारांना आरोग्यविषयक मार्गदर्शनही केले. ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांना धनुर्वात लसीकरण मोफत मिळाल्याने त्यांनी रसायनी डॉक्टर असोसिएशनचे आभार मानले.

## खांदा कॉलनीतील पाणीसमस्या सोडवा; अन्यथा आंदोलन -नगरसेविका सीता पाटील

**पनवेल : वार्ताहर**

ऐन पावसाळ्यात खांदा वसाहतीत पाणीटंचाई निर्माण झाली आहे. विशेष करून सेक्टर ७ परिसरात सोसायट्यांच्या पाणीटंचाई अधिक जाणवत आहे. त्यामुळे हा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी नगरसेविका सीता सदानंद पाटील यांनी सिडकोकडे अखंडित पाठपुरावा सुरू केला आहे. ही पाणी समस्या सोडविली नाही तर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेविका पाटील यांनी सिडकोला दिला आहे.

नवीन पनवेलचा पश्चिम भाग असलेल्या खांदा वसाहतीची लोकवस्ती ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. इतर वसाहतींच्या तुलनेत या ठिकाणी पाणीपुरवठा अत्यंत कमी होत आहे. त्यातच सिडकोकडे साठवणूक क्षमता नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. खांदा वसाहतीच्या एका टोकाला असलेल्या सेक्टर ७ येथे बीयुडीपीची घरे आहेत. त्या सोसायट्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण होत आहे. दरम्यान, पूर्वीच्या तुलनेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडूनच पाणी कमी मिळत आहे.

याबाबत नगरसेविका सीता पाटील यांच्या पाठपुराव्यानुसार सिडकोने सेक्टर ६ येथील जलकुंभावर मोटार पंप बसवला आहे. त्या माध्यमातून सेक्टर ७ करता प्रेशर दिला जात आहे. मध्यंतरी हे पंप बंद असल्याने कमी दाबाने पाणी पुरवठा होत होता, मात्र अद्यापही त्यामध्ये फारशी सुधारणा झाली नसल्याचे स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे. नगरसेविका पाटील यांच्या मागणीनुसार पाणीपुरवठा विभागाचे सहाय्यक अभियंता जगदाळे यांनी नुकतीच त्या परिसरात पाहणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या अनुषंगाने सर्वेक्षण केले. सर्व तांत्रिक बाबींची पडताळणी करून सेक्टर ७ परिसरातील सोसायट्यांना पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने सिडको प्रयत्न करत असल्याचे जगदाळे यांनी सांगितले.

दरम्यान, याबाबत त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात अन्यथा जलकुंभाला टाळा ठोकून नागरिकांच्या पाण्याच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नगरसेविका सीता पाटील यांनी दिला आहे.

## नवरात्रोत्सवात कमळाच्या फुलांना वाढती मागणी

**उरण : वार्ताहर**

नवरात्रोत्सव म्हणजे दुर्गा देवीची पूजा, अर्चा करण्याची वेळ. नवरात्रीच्या वेळेस विविध रंगाच्या कमळांच्या फुलांना मागणी असते. उरण बाजारपेठेतही कमळाची फुले विकावयास आली असून या फुलांना मागणी वाढली असल्याचे दिसून आले.

नवरात्रोत्सवामध्ये नऊ दिवस दुर्गामातेला कमळाचे फुल वाहून पूजन केले जाते. उरण बाजारात महालक्ष्मी ज्वेलर्स बाजूला, महाराष्ट्र स्वीट, राजपाल नाका आदी ठिकाणे ही कमळाची फुले विकणाऱ्या महिला दिसत आहेत. ही फुले एक नग १० रुपये तर लहान फुले पाच रुपयांस एक अशा दराने विकली जातात, असे फुलविक्रेती महिला बबीताई कातकरी हिने सांगितले.



## कोप्रोलीत स्त्रीरोग चिकित्सा-निदान शिबिर



**उरण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या उरण तालुक्यातील कोप्रोली येथील प्राथमिक शाळेत सीआरपी महिला बचत गटाच्या प्रमुख यांच्या संकल्पनेतून नेरूळच्या डी. वाय. पाटील आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या माध्यमातून मंगळवारी (दि. ५) पीसीओडी व मासिक पाळीच्या तक्रारीबाबत मोफत निदान चिकित्सा शिबिर झाले. भाजप युवा सचिव पूर्व विभाग कल्पेश म्हात्रे, बचत गटाच्या प्रमुख सरोज म्हात्रे यांनी आयोजित केलेल्या या चिकित्सा शिबिराला महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

या शिबिराचे उद्घाटन कोप्रोलीच्या सरपंच अलका म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित महिलांना महिलांचे आजार व त्यावर उपाययोजना यावर डॉक्टर व तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात आले. महिलांची आरोग्य तपासणी करून औषधे मोफत देण्यात आली. या वेळी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. दिव्या रामुगडे, असिस्टंट डॉ. अजिता भिसे, डॉ. सिरिषा करणम, सिस्टर्स सुषमा, कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाराम भोसले, ग्रामपंचायत सदस्य, आशा वर्कर्स, अंगणवाडी शिक्षिका, महिला बचत गट, सीआरपी महिला बचत गटाच्या महिला, शालेय विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार हेमाली म्हात्रे यांनी मानले.

## पनवेल मनपातर्फे लस आपल्या दारी!

**कळंबोली : बातमीदार, प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकाचे कोरोना लसीकरण व्हावे यासाठी पनवेल महापालिकेने आरोग्य विभागामार्फत नागरिकांचे लसीकरण आता गृह निर्माण संस्थांमधून जाऊन करण्याचे सुरू केले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कळंबोलीतील गुरुविल्ला हौसिंग सोसायटीमध्ये लस आपल्या दारी या आरोग्यदायी योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

नागरिकांच्या हिताची व आरोग्याची काळजी घेणारी ही योजना महापालिकेतील नगरसेवक बबन मुकादम यांच्या प्रयत्नाने साकारली गेली आहे. या योजनेचा फायदा कळंबोलीतील नागरिकांनी चांगला घेऊन उत्तम प्रतिसाद दिला.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार नागरिकांचे लसीकरण पूर्ण व्हावे या आरोग्य व सामाजिक हेतूने पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत गुरुवारी (दि. ७) कळंबोलीमध्ये लस आपल्या दारी या उपक्रमाचे शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. कळंबोलीतील गुरुव्हील्ला गृहनिर्माण सोसायटीमध्ये प्रारंभ करताना महापालिकेतील नगरसेवक बबन मुकादम, भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रवीशेठ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रिया मुकादम, कळंबोली भाजपाचे चिटणीस संतोष गायकवाड, प्रकाश शेलार, राजन पिल्ले, सोसायटीचे अध्यक्ष जगदीश पाटील, खजिनदार अशोक भोसले, गहीनाथ धुमाळ, दीपक दळवी, महापालिकेचे डॉ. अनिल पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अप्पा कुंभार, तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या देशातील प्रत्येकाची काळजी घेत असून देश कोरोना मुक्त व्हावा यासाठी ते अहोरात्र मेहनत घेत आहेत. केंद्राच्या योजनेतून विविध कल्याणकारी योजना या समाजासाठी त्यांच्याकडून मिळत आहेत. पनवेल महापालिकेच्या माध्यमातूनही नागरी सुविधा व समाजकार्य योजना या कार्यान्वित केल्या जात असून देशाची सुरक्षा व देशाचा विकास हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून साकारला जात आहे. लस आपल्या दारी या योजनेच्या माध्यमातून कळंबोलीतील जवळपास ७५ नागरीकांनी या योजनेचा फायदा घेऊन लसीकरण केले. यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही मोलाचे योगदान दिले.

## 'सुफल आहार'तर्फे गरीब बालकांना मोफत भोजन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

समाजातील गोरगरिबांना पोटभर अन्न मिळावे, अन्नाअभावी बालकांचे मृत्यू होऊ नये, लहान बालकांचे कुपोषण होऊ नये. त्यांना चांगले सुदृढ जीवन जगता यावे या दृष्टीकानातून सामाजिक बांधिलकी जपत उरण तालुक्यात सुफल आहाराच्या माध्यमातून उरण चारफाटा झोपडपट्टीतील मुलांना दररोज एकावेळचे मोफत अन्नदान करण्यात येत आहे.

कोरोना काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, धंदे व्यवसाय बंद झाले. घरातील कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सदस्यांना रोजगाराचे कोणतेच पर्याय उपलब्ध नव्हते. शिवाय कोरोना काळात घराबाहेर पडणेही मुश्किल झाले होते. अशा लॉकडाऊनच्या स्थितीत अनेक कुटुंबाची खूप मोठ्या प्रमाणात उपासमारी होत होती. कुटुंबातील लहान मुले अन्नासाठी तडफडत होती. कामधंदे नसल्याने लोकांच्या घरात राशन, अन्न पाणी नव्हते लोकांना उपाशी राहून दिवस काढावे लागत होते. या सर्व समस्या उरणमधील महिला सामाजिक कार्यकर्त्या सारिका पाटील यांच्या लक्षात येताच कोरोना काळात त्यांनी गोरगरीब कुटुंबातील लहान मुलांना, बालकांना दररोज मोफत अन्नदान करण्याचा निर्णय घेतला. कोरोना काळापासून सुरु असलेले अन्नदान आजही अविरतपणे, निस्वार्थी भावनेने, निरपेक्षपणे आजही चालू आहे.



सुफल आहाराच्या माध्यमातून गोरगरीब समाजातील लहान मुलांना एकवेळचे पोटभर अन्न मिळत असल्याने मुलांचे होणारी हेळसांड आता थांबली आहे. एकवेळचे सकस, पौष्टिक जेवण मिळत असल्याने बालकांचे कुपोषण थांबले आहे. अनेक व्यक्ती स्वतः जेवण बनविण्यापासून ते जेवण वाढण्या पर्यंत मोफत सेवा करत आहेत.सुफल आहाराची टीम द्वारे येथे अन्नदान करण्यात येते. मुलांना दररोज सकस आहार वेळेत मिळावा यासाठी प्रियांका सिंग, ईश्वरी कोंडीलकर, हंसराज चव्हाण, पप्पु सूर्यराव, सचिन उकार्डे, शिवानी कोळी, स्मिता नाखवा, सुरज सिंग, विकास शर्मा, प्रसाद पाटील, बादल म्हात्रे, पत्रकार विठ्ठल ममताबादे यांच्यासह सुफल आहाराची संपूर्ण टीम रात्रंदिवस मेहनत घेत आहेत, असे सारिका पाटील यांनी सांगितले.

ज्या इच्छुक व्यक्तींना अथवा सामाजिक संस्थांना या पवित्र कार्यात हातभार लावायचे आहे. त्यांनी सुफल आहारचे प्रमुख सारिका पाटील फोन नंबर ९६६४९७९६९६ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन सफल आहारच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# धुमसते काश्मीर

गेल्या काही दिवसांपासून काश्मीरमधील दहशतवादाने पुन्हा डोके वर काढले आहे असे दिसते. काश्मीरातील नागरिकांना, विशेषत: अल्पसंख्याकांना लक्ष्य करून होत असलेल्या या हत्यांचा उद्देश धार्मिक सलोखा बिघडवणे हाच आहे हेही स्पष्ट दिसते. काश्मीरमधील शांतता प्रक्रिया वेगाने सुरू राहावी असे भारताच्या प्रत्येक सुजाण नागरिकाला वाटते. काश्मीर खोरे हे भारताचे अविभाज्य अंग आहे. शत्रू राष्ट्रांनी ते हिसकावण्यासाठी कितीही कटकारस्थाने रचली तरी त्यात त्यांना कदापि यश येणार नाही.

**गेली साडेतीन दशके काश्मीर प्रश्नाने केंद्र सरकारला, मग ते कुठल्याही पक्षाचे असोत अक्षरश: वेठीला धरले आहे. स्वातंत्र्यापासूनच काश्मीरचा तिढा भारताला छळू लागला. त्याला अनेक कारणे आहेत. तो इतिहास पुन्हा पुन्हा उगाळण्याचे काहीच कारण नाही. गेली अनेक वर्षे छळणारा काश्मीर प्रश्न समूळ नष्ट करण्याचा संकल्प भारतीय जनता पक्षाने फार पूर्वी जाहीर केला होता. २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दणदणीत जनादेश मिळवत केंद्रातील सूत्रे हाती घेतली. त्यानंतर खऱ्या अर्थाने काश्मीर प्रश्नाच्या सोडवणुकीकडे लक्ष दिले गेले असे म्हटले तरी चालेल. दहशतवादाने होरपळलेल्या या पृथ्वीवरील नंदनवनात शांतता प्रस्थापित करण्यामधला सर्वांत मोठा अडथळा होता तो ३७० कलमाचा. काश्मीर खोऱ्याला स्वायत्तता देणाऱ्या या कलमाच्या आड राहून तेथील राजकीय नेत्यांनी भलभलते खेळ केले. सरहद्दीपलीकडून मिळणाऱ्या सक्रिय पाठबळाच्या जोरावर आणि स्वार्थी पुढाऱ्यांच्या आडोशाने तेथे दहशतवाद फैलावू लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम नोटाबंदी जाहीर करून दहशतवाद्यांना अर्थपुरवठा करणाऱ्यांचे कंबरडेच मोडले. अर्थात ही विषवल्ली सहजासहजी ठेचली जाणार नाही याची त्यांना कल्पना होतीच. भारतीय सुरक्षा यंत्रणा काश्मीरमधील दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर देऊ लागल्या आणि त्याचवेळी भारतीय फौजांनी सरहद्दीपलीकडील दहशतवादी ठाणी उद्ध्वस्त केली. ही धुमश्चक्री सुरू असतानाच केंद्र सरकारने जम्मू काश्मीरला लाभलेली कलम ३७०ची कवचकुंडले काढून घेतली. या साऱ्या प्रयत्नांमुळे मधल्या काळात दहशतवाद कमी झाला होता. दहशतवादी हल्ल्यांचे तुरळक प्रकार वगळता सर्वसाधारणपणे काश्मीरमधील जनता विकासाच्या वाटेवर हळूहळू का होईना वाटचाल करू लागली होती. तथापि, गेल्या काही दिवसांत शांततेच्या प्रयत्नांना पुन्हा खीळ बसते की काय, अशी शंका येऊ लागली आहे. गुरुवारी सकाळी श्रीनगरच्या मध्यवर्ती भागातील एका सरकारी शाळेत मुख्याध्यापिकेसह अन्य एका शिक्षकाची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. गेल्या पाच दिवसांत दहशतवाद्यांनी सात नागरिकांचा बळी घेतल्याने काश्मीरमधील दहशतीचे सावट गडद झाले आहे. ही घटना घडली तेव्हा शाळेत कुणीही विद्यार्थी उपस्थित नव्हते. या हत्याकांडाची बातमी पसरताच काश्मीरमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काश्मीरातील नागरिकांना विशेषत: अल्पसंख्याकांना लक्ष्य करून होत असलेल्या या हत्यांचा उद्देश धार्मिक सलोखा बिघडवणे हाच दिसतो आहे. सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी कारवायांबाबतची चिंता या हत्यासत्रामुळे अधोरेखित होत आहे, अशी प्रतिक्रिया परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. काश्मीरमधील शांतता प्रयत्नांना खीळ घालण्याचे काम शत्रू राष्ट्रे करीतच असतात, परंतु दुर्दैवाने त्यांना भारतीय नेतेमंडळींची अप्रत्यक्ष साथ मिळते हीदेखील वस्तुस्थिती आहेच. काश्मीरप्रश्नी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवण्याऐवजी विरोधी पक्षांनी खांद्यास खांदा भिडवून साथ द्यावी एवढीच अपेक्षा आहे.**

# सोडे बनविण्याच्या व्यवसायाला तेजी



रायगड जिल्ह्याला ३२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून, येथील समुद्रकिनारी राहणाऱ्या कोळी समाजाचा मासळी पकडणे हा मुख्य व्यवसाय आहे. हे लोक यांत्रीक बोटी किंवा छोट्या बोटींमधून समुद्रात जावून मासळी पकडतात व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मोठ्या बोटींने सापडलेली मासळी मोठ्या प्रमाणात मुंबई बंदरात विकली जाते, तर छोट्या बोटींना सापडलेली मासळी कोळी बांधव स्थानिक बाजारात विकतात.

मागील दोन वर्षे मच्छिमारांना अनेक संकटाना सामोरे जावे लागले. त्यामुळे आर्थिक मिळकत ठप्प होऊन येथील मच्छिमार कर्जबाजारी झाले आहेत. अवकाळी पाऊस, दोन वेळा झालेली चक्रीवादळे, पावसाचे वाढते प्रमाण यामुळे तसेच कोरोना नियमावलीमुळे मुख्य बाजार बंद असणे अशा अनेक कारणामुळे मच्छिमार हैराण झाले होते. आता कोरोना विषयीचे नियम शिथिल करण्यात आले असून, बाजारपेठा पूर्ण वेळ खुल्या झाल्याने व्यापाराला गती मिळत असून, त्याचा फायदा मच्छिमारांनासुद्धा होऊ लागला आहे. पाऊस परतीच्या मार्गावर असून मच्छिमार आता खोल समुद्रात जावून मच्छिमारी करू लागले आहेत. मच्छिमारांना सध्या मुबलक मासळी मिळत असून मागणीही मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याने चांगली किंमत मिळू लागली आहे.



**खबरबात**
**संजय करडे**

सध्या समुद्रात कोळंबी मोठ्या प्रमाणात मिळत आहे. रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, मुरूड, अलिबाग येथील समुद्रात मोठ्या प्रमाणात कोळंबी मिळू लागल्याने मच्छिमार सुखावले आहेत. काही कोळंबी बाजारात विकली जाते तर उर्वरित कोळंबीची साले काढून कडक उन्हात सुकवून तिचे सोडे बनवण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. मच्छिमारांच्या गृहिणी कोळंबीची साले काढून ती सुपावर अथवा टोपलीवर अंथरून उन्हात वाळवतात. सुकविलेल्या कोळंबीला सोडे म्हणतात. कोळंबी आठ ते दहा दिवस कडक उन्हात वाळविल्यानंतर तिचे सोडे तयार होतात. सोड्यांना चांगला भाव मिळतो. मुरूड हे पर्यटन स्थळ असल्याने येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. येथील सोडे विकत घेतल्याशिवाय कोणताही पर्यटक आपल्या घरी परत जात नाही.

सध्या मुबलक कोळंबी मिळत असल्यामुळे मुरूडमध्ये सोडे बनवण्याच्या व्यवसायाला तेजी आली आहे. त्यामुळे येथील गृहिणींना मोठा स्वयंरोजगार लाभला असून मोठंमोठे व्यापारी अगोदरच संपर्क साधून शंभर ते दीडशे किलोचा माल खरेदीसुद्धा करू लागले आहेत. सध्या मुबलक कोळंबी सापडत असल्याने सोड्यांचा भाव स्थिर आहे, परंतु कोळंबीची आवक घटली की, हाच भाव १८०० ते २००० हजार रुपये किलो होणार आहे. मुंबई, पुणे भागातील पर्यटकांना सोडे खूप पसंत असून ते मोठ्या प्रमाणावर सोडे विकत घेतात.

ऑगस्ट महिन्यापासून मासेमारीला सुरूवात झाली. कोळंबी मोठ्या प्रमाणात मिळाल्याने कोळी महिला ऑक्टोबरच्या कडक उन्हात कोळंबी सुकविण्याच्या कामात मग्न झाल्याचे दिसून येत आहे.

दिवाळी हंगामांत पर्यटक मोठ्या संख्येने मुरूड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी येतात व जाताना खास वर्षभर पुरेल एवढी ताजी सुकी मासळी खरेदी करतात. त्यामुळे सुक्या मासळीला मागणी वाढते. म्हणून महिला आतापासून सुक्या मासळीचा साठा करीत आहेत. राजपुरी परिसरातील कोळी महिला सकाळी मुरूड बाजारात मच्छी विकल्यानंतर दुपारच्या वेळेत मासे सुकवण्याचे काम करतात. जागा कमी असल्याने रस्त्याच्या कडेला मासळी सुकवण्याचे काम करावे लागते. दिवाळी हंगामाच्या अगोदर सुकी बनविण्यासाठी ऑक्टोबर महिन्यातील कडक ऊन त्यांना खूपच फायदेशीर ठरत आहे.

नांदगाव येथील मच्छिमार अमित भोबू यांनी सांगितले की, सध्या कोळंबीची आवक वाढल्याने आमच्या गृहिणी सोडे बनवण्याच्या कामात व्यस्त आहेत. सुकविण्यासाठी टाकलेल्या कोळंबीचे मांजर, कुत्र, कावळे यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी कोळी महिलांना कडक उन्हात जागता पहारा करावा लागतो. सोडे विकल्यावर त्यांच्या मेहनतीचे चीज होत असते.



# सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकडे श्रीवर्धन नगर परिषदेचे दुर्लक्ष

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



चक्रीवादळात नादुरुस्त झालेले श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वीत करण्याकडे नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेने शहरात एकूण बहात्तर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते व त्याचा डिस्प्ले पोलीस ठाणे व नगर परिषद कार्यालय या ठिकाणी ठेवण्यात आला होता. हे सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्यानंतर शहरात एकही चोरीची घटना घडली नव्हती. मात्र श्रीवर्धन, हरिहरेश्वर परिसराला निसर्ग व तौत्के चक्रीवादळाचा तडाखा बसला. त्यात श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले अनेक खांब पडले, काही सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त झाले तर अनेक कॅमेरे पूर्णपणे फुटले.

सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वीत नसल्याने शहरात चोऱ्यांच्या घटना घडू लागल्या आहेत. मात्र शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वीत करण्याकडे श्रीवर्धन नगर परिषद प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.

श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे पूर्ववत चालू करावेत, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे

# महडचे वरदविनायक मंदिर भाविकांनी फुलले

(छाया : विनायक माडपे)





**खोपोली : प्रतिनिधी**

कोरोना संसर्ग निर्बंधामुळे बंद असलेल्या महड (ता. खालापूर) येथील वरदविनायक मंदिराचे दरवाजे घटस्थापनेच्या दिवशी (दि. ७) उघडण्यात आल्याने पहाटेपासूनच भाविक दर्शनासाठी येत होते.

अष्टविनायकापैकी एक असलेल्या महड येथील वरदविनायक मंदिर गेल्या दहा महिन्यांपासून बंद होते. सतत गजबजणारे हे मंदिर भाविकांविना सुनेसूने वाटत होते.

संभाव्य तिसऱ्या लाटेमुळे मंदिर कधी उघडणार याची शाश्वती नसल्याने परिसरातील छोटे दुकानदार, पुजारी यांची चिंता वाढली होती. परंतु घटस्थापनेच्या दिवशी बाप्पांनी चिंता दूर केल्याची भावना पुजारी मंदार जोशी यांनी व्यक्त केली.

गुरुवारी पहाटे साडेसहा वाजता मंदिर व्यवस्थापक बडगुजर, मुख्य पुजारी आणि भाविकांच्या उपस्थित मंदिराचा मुख्य दरवाजा उघडण्यात आला. या वेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी बाप्पाचा जयघोष केला. मात्र घटस्थापनेचा दिवस असल्याने भाविकांची गर्दी कमी होती.

**गणरायाजवळ प्रार्थना आहे की, पुन्हा असे संकट येवू नये. मंदिर उघडण्यात आल्याने सर्वच आनंदी आहेत. परंतु मास्क, सॅनिटायझर आणि सामाजिक अंतर पालन करणे आवश्यक आहे.**
**–मोहिनी वैद्य, कार्याध्यक्ष, महड देवस्थान**

# कर्जत भिसेगावची श्री अंबे भवानी

**कर्जत : संतोष पेरणे**



येथील रेल्वे स्थानकापासून अगदी दोन–तीन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या भिसेगावमध्ये श्री अंबे भवानीमातेचे मंदिर आहे. नवसाला पावणारे जागृत देवस्थान अशी या स्थळाची प्रचिती आहे.

कर्जत नगर परिषद हद्दीत असलेले भिसेगाव हे गाव भिसेखिंडीच्या पायथ्याशी आहे. पूर्वी या ठिकाणी खूप जंगल होते. व्यापारासाठी मुंबई–पुण्याकडे जातांना व्यापारी याच खिंडीच्या मार्गाने जात. खिंडीजवळ असलेल्या विहिरीजवळ रात्री मुक्काम करून हे व्यापारी सकाळी पुढील प्रवासाला निघत. येथे मुक्कामाला असतांना एका गुजराथी व्यापाऱ्याला स्वप्न पडले. स्वप्नात देवीने दर्शन दिले. मी या विहिरीजवळ असलेल्या वारुळात आहे. मला त्यातून बाहेर काढ, माझ्या सोबतीला एक काळा नाग आहे. तो तुम्हाला काही करणार नाही, असा दृष्टांत दिला. मात्र त्याकडे लक्ष न देता तो व्यापारी तेथून पुढे निघून गेला. काही दिवसांनी पुन्हा या ठिकाणी तो व्यापारी मुक्कामास आला असता त्याला तसाच दृष्टांत झाला. हा सर्व वृत्तांत त्याने आपल्या व्यापारी मित्रांना सांगितला. त्या वेळी सर्व व्यापाऱ्यांनी ते ठिकाण शोधण्याचे ठरविले. डोंगरमाथ्यावर राहणाऱ्या आदिवासींना मदतीला बोलून घेतले. तेथील वारुळ फोडताना काळा नाग बाहेर आला मात्र कुणालाही काही न करता तो निघून गेला. त्यानंतर देवीची सुंदर रेखीव मूर्ती हाती आली. ती पाहून सर्वांना आनंद झाला. आदिवासी व व्यापाऱ्यांनी सावली म्हणून मूर्तीच्या डोक्यावर छप्पर उभारले. तेंव्हापासून व्यापारी येथून येता–जाताना देवीचे दर्शन व पूजा करू लागले.




### ग्रामस्थांनी केला जीर्णोद्धार

***ज्या आदिवासी माणसाने वारुळास प्रथम हात लावला त्याच्या स्वप्नात जाऊन देवीने सांगितले की, मी गुजरात येथील अबुच्या पहाडावरील श्री अंबे भवानी आहे. तेव्हापासून या देवीला श्री अंबे भवानी माता असे लोक म्हणू लागले. ग्रामस्थांनी एकत्र येऊन मंदिराचा जीर्णोद्धार केला असून मंदिर परिसरात मोठा सभा मंडप उभारून गोरगरीब लोकांच्या शुभकार्याची व्यवस्था केली आहे.***

# नांदगावच्या सिद्धिविनायक मंदिराचेही दार उघडले

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मंदिरे खुली करण्याच्या निर्णय घेतल्यानंतर घटस्थापनेच्या मुहुर्तावर गुरुवारी (दि. ७) नांदगाव येथील श्री सिध्दिविनायक मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.

रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कोरोनासंदर्भात विशेष खबरदारी घेत चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्ट, सेवा मंडळ–नांदगाव, सालकर जोशी पुजारी ट्रस्ट यांनी गुरुवारी पहाटे मंदिराचे दरवाजे उघडले आणि भक्तांसह, पुजारी, मंदिराजवळ असलेल्या छोट्या मोठ्या विक्रेत्यांनी आनंद व्यक्त केला. मंदिराचे पुजारी विनायक जोशी व महेश जोशी यांनी श्रींची पाद्यपूजा केल्यानंतर मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.

मुरूडची ग्रामदेवता कोटेश्वरी देवीचे मंदिरही घटस्थापनेलाच खुले झाल्याने भक्तांनी आनंद व्यक्त केला. देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी रांग लावली होती.

एकदरा येथील श्री कालभैरव श्रीराम मंदिराचे पुजारी रामकृष्ण आगरकर यांनी सांगितले की, मागील दीड वर्षांपासून मंदिराचे दरवाजे बंद होते. शासनाच्या आदेशाप्रमाणे गुरुवारी मंदिराचे दरवाजे उघडले असून कोरोनाविषयक नियमावलीचे पालन करून भाविकांना मंदिरात प्रवेश दिला जात आहे.



(छाया : संजय करडे)

## प्रतापगडसाठी एसटी बसच्या विशेष फेऱ्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रोत्सवामध्ये प्रतापगडाकडे जाणाऱ्या देवीभक्तांसाठी एसटी बसच्या विशेष फेऱ्या सुरू झाल्याची माहिती महाड आगारप्रमुख शिवाजी जाधव यांनी दिली.

नवरात्रोत्सव काळात महाड आगारातून रोज सकाळी ७ आणि दुपारी २ वाजता तर प्रतापगड येथून सकाळी ११.३० आणि सायंकाळी ५.३० वाजता बस सोडण्यात येतील. भाविकांनी याची नोंद घेऊन या एसटी बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाड आगार प्रमुख शिवाजी जाधव यांनी भाविकांना केले आहे.



# आदर्श पतसंस्थेच्या क्यूआर कोड सुविधेला प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने आपल्या ग्राहकांसाठी क्यूआर कोड सुविधा सुरु करुन थेट कोड स्कॅन करुन व्यवहार करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. या सुविधेचा प्रारंभ नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या हस्ते गुरूवारी (दि. ७) करण्यात आला.

आदर्श भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कैलास जगे, संचालक विजय पटेल, अनंत म्हात्रे, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील, अभिजीत पाटील, वर्षा शेठ, तज्ज्ञ संचालक सुरेश गावंड, कार्यलक्षी संचालिका मीनाक्षी पाटील यांच्यासह कर्मचारी व सभासद उपास्थित होते. यावेळी सुरुची रेस्टॉरंटचे रोहन चिमणे, सुरुची आइस्क्रीम पार्लरचे अरुण जैस्वाल, विनी एंटरप्राइजेस संतोष ल्हासे, प्रिन्स डिझायनर स्टुडिओ कैलासकुवर राठोड यांना क्यूआर कोडचे वितरण करण्यात आले.

आर्थिक व्यवहार तसेच बिल पेमेंट करण्यासाठी यापूर्वी आमच्या पतसंस्थेने ग्राहकांसाठी अॅप उपलब्ध करून दिले आहेत. त्याचा वापर आदर्शचे ग्राहक करत आहेत. सध्या आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे २८०० सदस्य आदर्शच्या इतर ऑनलाईन सुविधांशी अॅक्टीव आहेत. अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या संकल्पनेतून आदर्श नागरी पतसंस्थेच्या माध्यमातून क्यूआर कोड सुविधा सुरु करून खातेदारांसाठी थेट कोड स्कॅन करून व्यवहार करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती आदर्शचे संचालक अभिजीत पाटील यांनी या वेळी दिली. व्यवस्थापक उमेश पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी पतसंस्थेची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेत नागोठणे व्यापारी सहकारी पतसंस्था आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेत विलीन करण्याचा ठराव अध्यक्ष सुरेश पाटील यांनी मांडला, तो मंजूर करण्यात आला. सभेचे सूत्रसंचालन जगदीश पाटील यांनी केले.

# श्री धावीर महाराजांच्या पालखी उत्सवाला परवानगी

## आयोजकांनी गर्दीवर नियंत्रण ठेवून नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी –जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर

**रोहे : प्रतिनिधी**

श्री धावीर महाराज पालखी उत्सवाच्या दरम्यान कुठेही गर्दी होऊ नये यासाठी आयोजकांनी लक्ष द्यावे. व भाविकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, असे आवाहन रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी रोहे येथे केले.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या सभागृहामध्ये नुकताच श्री धावीर महाराज पालखी उत्सवासंदर्भात बैठक घेण्यात आली. कोरोनाचे नियम पाळत, सुरक्षेची काळजी घेत श्री धावीर महाराज पालखी उत्सव साजरा करण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे या वेळी प्रशासनाच्याकडून सांगण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी कल्याणकर उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते.

या पालखी उत्सवादरम्यान अधिकचा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येईल, असे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी यांनी सांगितले. शासनाने दिलेल्या सर्व नियमांचे पालन करून आम्ही पालखी उत्सव साजरा करू, अशी ग्वाही श्री धावीर ट्रस्टचे मकरंद बारटक्के यांनी या वेळी दिली. पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी लोकप्रतिनिधी, शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी, श्री धावीर ट्रस्टचे पदाधिकारी, उत्सव समितीचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. दरम्यान, श्री धावीर महाराज पालखी उत्सवाला परवानगी दिल्यामुळे नागरिक व श्री धावीर भक्तांमध्ये उत्साह संचारला आहे.



(संग्रहित छायाचित्र)



## द्रुतगती महामार्गावर दोन वाहनांना लागली आग

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन वाहने जळाल्याच्या घटना घडल्या आहेत.

पहिली घटना गुरुवारी (दि. ७) रात्री रात्री ११च्या सुमारास मुंबई लेनवर तर दुसरी घटना शुक्रवारी (दि. ८) पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने या दोन्ही घटनांत जीवितहानी झाली नाही, मात्र कार जळून खाक झाल्या.

द्रुतगती महामार्गावरुन चाललेल्या डस्टर (एमएच ४८–एटी १३६६) कारला गुरुवारी रात्री ११वाजण्याच्या सुमारास खालापूर टोल नाक्याजवळ फुडमॉल परिसरात आग लागली. त्याचा अंदाज येताच चालकाने प्रसंगावधान दाखवून कार थांबविली. त्यामुळे कारमधून प्रवास करणारे चौघे सुखरूप बाहेर पडले. त्यानंतर कार जळून खाक झाली.



दुसरी घटना खालापूर टोलनाक्याजवळील पालीफाटा ब्रीजदरम्यान घडली. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास सिमेंट वाहून नेणाऱ्या बल्करचा लायनर जॅम झाल्याने उजव्या बाजूच्या मागील टायर्सना आग लागली. या घटनेची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, वाहतूक पोलीस आणि डेल्टा फोर्सचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने मदतकार्य सुरू केल्याने आग आटोक्यात आली.

### जाहिरात

तलाव ठेका शासन निर्णय दि. ०३/०७/२०१९ अन्वये सन २०२१–२२ ते सन २०२५–२६ या पाच वर्ष कालावधीकरीता जिल्ह्यातील ५०० हे. खालील एकूण ४ पाटबंधारे तलाव ई–निविदे प्रक्रियेद्वारे मासेमारीकरीता ठेक्याने देण्यासाठी पात्र मत्स्यव्यवसाय संस्था / मच्छिमार / मत्स्यसंवर्धक / खाजगी उद्योजक यांचेकडून ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

याबाबतचा सविस्तर तपशिल मुख्य संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे. तरी इच्छुक निविदाधारकांनी याचा लाभ घ्यावा आणि अधिकच्या माहितीसाठी शासकीय कार्यालयीन वेळेत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड–अलिबाग, तिसरा मजला, सिद्धी अपार्टमेंट, पेण रोड, चेंढरे, अलिबाग– ४०२२०१, दूरध्वनी क्र. ०२१४२–२५९२२१ येथे संपर्क साधावा.

**–स्वाक्षरीत–**
**(एस. आर. भारती)**
**सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,**
**रायगड–अलिबाग**

**क्र. जिमाका/राअ/जाहि./११८/२०२१–२२**

### महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल

**पिनकोड–४१०२०६**
**E-mail- panvel.ee@mahapwd.com**
**दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०**

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ४७ (ई-निविदा) सन २०२१-२२**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२– २७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या कामांकरिता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप– या निविदेमध्ये एकूण ०३ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १२.१०.२०२१ सकाळी १०.०० ते दिनांक २६.१०.२०२१ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/३४५०**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक :– ०७/१०/२०२१**

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, पनवेल**

**विमाका/कोवि/२०२१–२०२२/१७४**

## रोह्यात तरुणाची आत्महत्या

**धाटाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील उसर येथील हेमंत हिरु जोध (वय ३२) याने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. हेमंत बुधवारपासून बेपत्ता होता. शुक्रवारी (दि. ८) सकाळी त्याचा मृतदेह उसर येथील एका विहिरीत आढळला.

हेमंत जोध हा मतीमंद होता. बुधवारी संध्याकाळी तो कोणालाही न सांगता घरातून एकटाच निघून गेला होता. ग्रामस्थ व नातेवाईक त्याचा दोन दिवस शोध घेत होते. शुक्रवारी त्याचा मृतदेह घाडगे यांच्या शेतातील विहिरीत आढळला. पुढील तपास रोहा पोलीस करीत आहेत.

## अलिबागमध्ये एकाच दिवशी तीन घरफोड्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरात दिवसाढवळ्या तीन घरफोड्या झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे अलिबागमध्ये एकच खळबळ उडाली.

अलिबाग बाजारपेठेतील एका बंद घरातून चार लाख रोख आणि दागिने चोरट्यानी लंपास केले. तर बाजारपेठमध्ये आणखी एका ठिकाणी चोरी झाली. तसेच मारुतीनाका येथेही घरफोडी झाल्याची घटना घडली. मात्र या तीनही चोऱ्यांबाबत अलिबाग पोलीस ठाण्यातून माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. संध्याकाळपर्यंत चोरीच्या गुन्ह्याची नोंद झाली नव्हती,त्यामुळे अधिकृत माहिती मिळाली नाही.



## भरकटलेल्या दोन आदिवासी मुलींचे पालक शोधण्यात मुरूड पोलिसांना यश

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदगाव जेट्टी परिसरात दोन अल्पवयीन आदिवासी मुली बराचवेळ फिरत होत्या. त्यांना ताब्यात घेऊन मुरूड पोलिसांनी अवघ्या २४ तासात त्यांच्या पालकांना शोधून काढले व त्या अल्पवयीन मुली त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिल्या.

नांदगाव जेट्टी परिसरात दोन आदिवासी अल्पवयीन मुली फिरत असल्याची माहिती मिळताच सहाय्यक फौजदार दीपक राऊळ, पोलीस नाईक विलास आंबेतकर, सुरेश वाघमारे,महिला पोलीस नाईक नीलिमा वाघमारे, शिपाई सागर रसाळ हे तातडीने या ठिकाणी दाखल झाले. त्यांनी विचारपूस केल्यानंतर या मुलींनी आपले नाव पिंकी काशिनाथ वाघमारे (वय ८) आणि शेउ काशिनाथ वाघमारे (वय ९, रा. दोन्ही रा. आदगाव) असल्याचे सांगितले.

आदगाव हे दिघी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी त्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधून दोन मुलींचे पालक शोधण्याची विनंती केली. दिघी पोलिसांनी या मुलींच्या आई, वडिलांना शोधले व मुरुड पोलीस ठाण्यात पाठविले. आई, वडील दिसताच मुली त्यांना बिलगल्या.

### PANVEL MUNICIPAL CORPORATION
### Public Notice

Maharashtra Municipal Corporation Act,1949 Section 205, 206 & 209
No. PMC/TPD/ROADS/26-21/S.NO.06/2033/2021
Date 8/10/2021

Whereas the Ambarnath - Kulgaon Badlapur & Surrounding Notified area Development Plan has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department vide notification no. TPS - 1204/941/CR - 1630/UD -12, dated 25 July 2005 and it has came into force with effect from 12th August 2005 (hereinafter referred as the said MMRDA Development plan);

And Whereas, the Govt., in exercise of the powers conferred by Section 113(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "said Act") has designated site for New - Town of Navi Mumbai (hereinafter referred to as "Said New Town") vide Urban Development and Public Health Department's (UD and PH) Notification No. RPB. 1171/18124/I.W., dated the 20th March 1971 and CIDCO has been appointed as New Town Department Authority (NTDA) for the said New Town Under Section 113(3A) of the said Act vide Urban Development and Public Health Department's Notification No.RPB. 117/18124/II.W., dated the 20th March 1971;

And whereas, the Govt. in exercise of the Powers conferred by Section 31(1) of the said Act vide UD and PHD's Notification No.RPB. 1175/635/UD-5, dated the 18th January 1980 has been sanctioned the Draft Development Plan (hereinafter referred to as said Final Development Plan) in the form of structural plan submitted by CIDCO for the said New Town area and the said Final Development Plan came into force with effect from 1st March 1980;

And whereas, the Government in exercise of the power conferred by Section 3 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949 (hereinafter referred to as the "said MMC Act") vide the Urban Development Department notification no. PNP.2014/VIP No. 301/CR. 354/UD/23 dated the 26th September, 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council & 29 revenue villages specified therein, which came into force with effect from 1st October 2016.

And whereas; the said MMRDA Development Plan's 11 revenue villages has been included in the Panvel Municipal Corporation Area;

And whereas, the said Final Development Plan & said MMRDA Developed Plan are adjecent to each other and the roads already developed in the said Sanctioned Development plan are up to the boundary limit of Taloje Majkur revenue village in said earstwhile MMRDA Development Plan;

And whereas there are Missing links in the said Final Development Plan & the said MMRDA Development Plan it has become expedient to connect the Missing Links by preparing new roads so as to enable the traffic Smoothly & to make the conveniently traffic within the Panvel Municipal Corporation;

And whereas, as per the provisions of the said MMC Act, Sections 205, 206, & 209 empowers the Municipal Corporation to prepare the new roads, to decide the width of the roads and to improve the roads within the Municipal Corporation Area;

And whereas, the Panvel Municipal Corporation vide General Body Resolution no. 190 dated 05/09/2019 delegated the powers under Section 205, 206 & 209 of the said MMC Act to Commissioner, Panvel Municipal Corporation;

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I, Ganesh Deshmukh Commissioner, Panvel Municipal Corporation here by declares the Missing Links as mentioned in the Schedule 'A' and a plan appended hereto Schedule 'B' showing the alignment of the Missing Links is kept open for the inspection of the public on all working days and in working hours in the office the of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation.

Any citizen, who want to submit any objection and/or suggestion about the proposed alignment of the road, he/ she may submit in writing to the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation, Town Planning Department, 3rd floor Fire Brigade Building, Near Devale Talav, Panvel within 30 days from the publication of this notice in Maharashtra Government, Gazette. It shall be noted that, suggestion or objection if any, received by Panvel Municipal Corporation in writing within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette would only be considered by the Municipal Commissioner, Panvel Municipal Corporation. The suggestion/objection received after 30 days would not be considered.

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

**'Schedule 'A'**
**Description of Road**

Layout and make a new public street/road from S.No.131 of Mouje Taloja Majkur revenue village to S.No.66 of Mouje Ghot revenue village.
Details of S.No. of lands affected by the proposed alignment of the new road is as below.

| S.No. | Name of Revenue village and Survey No. |
|---|---|
| 1 | **MoujeTaloja Majkur :** 131(p), 129(p), 78(P), 79(p),80(p),107(p),106(P), 108(p) |
| 2 | **Mouje Ghot :** 52(p), 53(p), 54(p), 66(p) |

Note :- Other than above listed survey number, if any other survey number existed while laying out the road then it will also be the part of the above proposed road.

**'Schedule 'B'**

Plan showing proposed alignment of both roads is kept open for Inspection in the office of the Assistant Director Of Town Planning, Panvel Municipal Corporation.

Panvel.
Date :- 07/10/2021

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर प्रगटन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५, २०६ व २०९ अन्वये
जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६–२१/प्र.क्र.०६/२०३३/२०२१
दिनांक : ०८/१०/२०२१

ज्याअर्थी अंबरनाथ – कुळगांव बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टी पी एस–१२०४/९४१/सीआर–१६३/०४/नवि–१२ दि. २५ जुलै २००५ अन्वये शासनाने मंजूर केली आहे आणि उक्त विकास योजना दि. १२ ऑगस्ट २००५ पासून अंमलांत आलेली आहे (यात या पुढे ज्याचा उल्लेख ''उक्त एम एम आर डी ए विकास योजना'' असा करण्यात आला आहे);

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याच्या निर्देश ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आला आहे) चे कलम ११३(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासनाने नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७१/१८१२४/११३/आय डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ द्वारे, यात नमूद करण्यात आलेले क्षेत्र हे नवी मुंबई ह्या नवीन नगराचे क्षेत्र म्हणून घोषित केले आहे व सिडकोस नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. १८१२४/II डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ अन्वये, उक्त अधिनियमांच्या कलम ११३(३अ) नुसार नवी मुंबई या नवीन नगर क्षेत्रासाठी (उक्त नवनगरक्षेत्र) नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासनाने उक्त नवनगर क्षेत्रासाठी सिडकोने सादर केलेल्या रचनाबद्ध आराखड्याच्या (Structural Plan) स्वरूपात असलेल्या प्रारूप विकास योजनेस (उक्त अंतिम विकास योजना) नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/यूडी –५, दिनांक १८ ऑगस्ट १९७९ सह अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/यूडी–५, दिनांक १८ जानेवारी १९८० अन्वये मंजुरी दिलेली आहे आणि उक्त विकास योजना दिनांक १ मार्च १९८० पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त महानगरपालिका अधिनियम'' असा करण्यात आला आहे) चे कलम ३ च्या पोट कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप – २९१४/व्ही आय फी सं.क्र. ३०१/प्र.क्र. ३५४/नवि–२३, दि. २६ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये उक्त एम एम आर डी ए विकास योजनेतील ११ महसुली गावांचा समावेश करणेत आलेला आहे;

आणि ज्याअर्थी उक्त अंतिम विकास योजना व उक्त मंजूर एम एम आर डी ए विकास योजना या एकमेकांना लागून आहेत आणि मंजूर विकास योजनेतील रस्ते उक्त मंजूर तत्कालीन एम एम आर डी ए विकास योजनेतील तळोजे मजकूर या महसुली गावाच्या हद्दीपर्यंत तयार करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अंतिम विकास योजना व उक्त मंजूर एम एम आर डी ए विकास योजनामध्ये Missing Links असल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक सोयीची व दळणवळण सुकर होण्यासाठी नवीन जोड रस्ते तयार करणे गरजेचे आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये नविन रस्ते तयार करणे, रस्त्याची रूंदी निश्चित करणे व रस्त्यांची सुधारणा करणेचा अधिकार महानगरपालिकेला आहे;

आणि ज्याअर्थी वरील संदर्भ उक्त करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १९० दि. ०५/०९/२०१९ अन्वये आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना प्राधिकृत केले आहे;

त्याअर्थी, मी गणेश देशमुख आयुक्त, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये खालील परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या नविन जोड रस्त्याचे आखणी व परिशिष्ट 'ब' मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे रस्त्याचे संरेखांकन जाहीर करीत आहे. सदर परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' च्या प्रती नागरिकांच्या पाहणीकरिता सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत खुला ठेवण्यात आलेल्या आहेत.

कोणत्याही नागरिकास प्रस्तावित रस्त्याचे आखणीबाबत काही हरकती किंवा सूचना असल्यास हे जाहीर प्रकटन महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, ३ रा मजला, अग्निशमन इमारत, देवाळे तलाव पनवेल महानगरपालिका, यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयात वेळेत सादर कराव्यात. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध दिनांकापासून ३० दिवसाचे आत प्राप्त झालेल्या सूचना किंवा हरकती यांचाच विचार केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**सही/–**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

**परिशिष्ट –अ**
**रस्त्याचे संक्षिप्त विवरण**

मौजे– तळोजा मजकूर या महसुली गावाच्या स. नं. १३१ पासून ते मौजे– घोट या महसुली गावाच्या स. नं. ६६ पर्यंत १५.०० मी. रुंदीचा नवीन सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करणे.
वरील रस्त्याचे संरेखांकनामुळे बाधित होणारे सर्व्हे नं./गट नं.

| अनु.क्र. | महसुली गावाचे नाव | सर्व्हे नं./गट नं. |
|---|---|---|
| १ | मौजे– तळोजा मजकूर | १३१ (पैकी), १२९(पैकी), ७८ (पैकी), ७९ (पैकी), ८० (पैकी), १०७ (पैकी), १०६ (पैकी), १०८ (पैकी) |
| २ | मौजे– घोट | ५२(पैकी), ५३(पैकी), ५४(पैकी), ६६(पैकी) |

**टीप :–** वरील रस्त्याची प्रत्यक्ष आखणी करतेवेळी वरील बाधित जागेव्यतिरिक्त इतर जागा बाधित होत असल्यास सदरची जागा ही प्रस्तावित रस्त्याचा भाग समजण्यात येईल.

**परिशिष्ट – ब**

प्रस्तावित रस्त्याचे संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या पाहणीकरिता सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

**सही/–**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

# विजयानंतरही पंजाब आयपीएलबाहेर



**दुबई : वृत्तसंस्था**

कर्णधार के. एल. राहुलने (४२ चेंडूंत नाबाद ९८ धावा) साकारलेल्या तुफानी खेळीच्या बळावर गुरुवारी पंजाब किंग्जने इंडियन प्रीमियर लीगमध्ये चेन्नई सुपर किंग्जवर सहा गडी आणि ४२ चेंडू राखून दणदणीत विजयाची नोंद केली, मात्र तरीही पंजाबचा संघ स्पर्धेबाहेर झाला आहे.

चेन्नईने दिलेले १३५ धावांचे लक्ष्य पंजाबने १३ षटकांत गाठल्यामुळे त्यांची निव्वळ धावगती मुंबईपेक्षाही सरस झाली आहे. स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या शर्यतीत अग्रस्थानी असलेल्या राहुलने (६२६) तब्बल सात चौकार आणि आठ षटकारांची आतषबाजी केली.

तत्पूर्वी, फाफ ड्यू प्लेसिसच्या (५५ चेंडूंत ७६ धावा) झुंजार खेळीमुळे चेन्नईने ६ बाद १३४ धावांपर्यंत मजल मारली. ऋतुराज गायकवाड (१२), मोईन अली (०), अंबाती रायुडू (४) यांना छाप पाडता आली नाही. चेन्नईच्या पराभवामुळे बंगळुरूच्या अव्वल दोन संघांत मुसंडी मारण्याच्या आशा उंचावल्या आहेत. त्यामुळे चुरस दिसून येत आहे.

**संक्षिप्त धावफलक**

चेन्नई सुपर किंग्ज : २० षटकांत ६ बाद १३४ (फाफ ड्यू प्लेसिस ७६; ख्रिस जॉर्डन २/२०, अर्शदीप सिंग २/३५) पराभूत वि. पंजाब किंग्ज : १३ षटकांत ४ बाद १३९ (के. एल. राहुल नाबाद ९८; शार्दूल ठाकूर ३/२८).

# कोलकाता संघ प्ले ऑफजवळ

**शारजा : वृत्तसंस्था**

कोलकाता नाइट रायडर्सने गुरुवारी इंडियन प्रीमियर लीगच्या बाद फेरीतील चौथे स्थान जवळपास पक्के केले आहे. शुभमन गिलचे (५६ धावा) अर्धशतक आणि शिवम मावीच्या (४/२१) भेदक गोलंदाजीच्या बळावर कोलकाताने राजस्थान रॉयल्सचा ८६ धावांनी फडशा पाडला.

कोलकाताने दिलेल्या १७२ धावांचा पाठलाग करताना राजस्थानचा डाव ८५ धावांत आटोपला. मावी आणि लॉकी फर्ग्युसनचा (३/१८) राहुल तेवतियानेच (४४) थोडाफार प्रतिकार केला. त्यामुळे पंजाब आणि राजस्थान यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले, तर मुंबईपुढेही अशक्यप्राय असे समीकरण उभे ठाकले आहे.

प्रथम फलंदाजी करताना गिलने सलग दुसरे अर्धशतक झळकावल्याने कोलकाताने ४ बाद १७१ धावा उभारल्या. त्याला व्यंकटेश अय्यरसह (३८) अन्य फलंदाजांनी मोलाची साथ दिली.

**संक्षिप्त धावफलक**

केकेआर : २० षटकांत ४ बाद १७१ (शुभमन गिल ५६, व्यंकटेश अय्यर ३८; चेतन साकारिया १/२३) विजयी वि. राजस्थान : १६.१ षटकांत सर्व बाद ८५ (राहुल तेवतिया ४४; शिवम मावी ४/२१, लॉकी फर्ग्युसन ३/१८).

# अंशू मलिकला ऐतिहासिक ‘रौप्य’

**ओस्लो : वृत्तसंस्था**

युवा कुस्तीपटू अंशू मलिकने जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत ५७ किलो वजनी गटाचे रौप्यपदक जिंकताना इतिहास घडवला. २०१६च्या ऑलिम्पिक विजेत्या हेलेन लॉसी मॅरोलिसने अंतिम सामन्यात तिला चीतपट केले. त्यामुळे भारताला पहिल्या महिला जगज्ञेतेपदासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

जागतिक स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी पहिली महिला कुस्तीपटू ठरलेल्या १९ वर्षीय अंशूने आक्रमक सुरुवात करताना १-० अशी आघाडी घेतली, परंतु त्यानंतर सामन्याने नाट्यमय कलाटणी घेतली. मॅरोलिसने अंशूच्या खांद्याची पकड घेत तिला जमिनीवर आदळत २-१ अशी आघाडी घेतली. मग मॅरोलिसने अंशूची पाठ टेकवत चीतपट केले आणि ४-१ अशा फरकाने विजय मिळवला.

# नीरज चोप्राच्या ‘त्या’ भाल्याला दीड कोटींची बोली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भालाफेकपटू नीरज चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला होता. नीरजने ज्या भाल्याचा थ्रो करून सुवर्णपदक पटकावले होते त्या भाल्याला लिलावात तब्बल दीड कोटींची बोली लागली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेट म्हणून आलेल्या वस्तूंचा ई-लिलाव ठेवण्यात आला. हा लिलाव पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसापासून म्हणजेच १७ सप्टेंबरपासून सुरू होता. सर्व भेटवस्तूंपैकी नीरजच्या भाल्यावर सर्वांत जास्त बोली लागली आहे.



सांस्कृतिक मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, गुरुवारी रात्रीपर्यंत काही वस्तूंवर बोली लावण्यात आली, परंतु ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक खेळाडूंनी त्यांच्या खेळादरम्यान वापरलेल्या क्रीडा उपकरणांसह बहुतेक वस्तूंची बोली संध्याकाळी बंद करण्यात आली. मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलंय, ई-लिलावादरम्यान ८,६००हून अधिक बोली लागल्या आहेत.

याशिवाय भवानी देवीची ऑटोग्राफ केलेली फेन्स (१.२५ कोटी), सुमित अंतिलचा भाला (१.२ कोटी), टोकियो २०२० पॅरालिम्पिक दलाने ऑटोग्राफ केलेली अंगवस्त्रे (एक कोटी) आणि लवलीना बोर्गोहेनच्या ग्लोव्हजवर (९१ लाख) रुपयांची बोली लागली, अशी माहिती मंत्रालयाने दिली.

## आरोग्य प्रहर

# वजन कमी करण्यासाठी ‘या’ पदार्थांचा करा नाश्ता

वजन कमी करणे हे काही सोपे काम नाही. त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. वजन कमी करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशातच खाण्यात काही बदल करून तुम्ही वजन कमी करू शकता. खाण्यात केलेल्या या बदलामुळे तुम्हाला भूकही कमी लागेल आणि तुमचे पोटही भरलेले राहील.



सकाळी नाश्ता न करताच आपली दैनंदिन कामे सुरू करणे तुमच्या तब्येतीसाठी हानिकारक ठरू शकते, पण तुम्ही सोप्या पद्धतीने नाश्ता बनवून तुम्ही वजन कमी करू शकता आणि खाण्यात केलेल्या या बदलामुळे तुम्हाला भूकही कमी लागेल. चला तर मग जाणून घेऊया काय आहेत त्या रेसिपी.

**भाज्यांसोबत खा अंडी –** अंड्यांमध्ये असलेल्या पांढऱ्या भागातमध्ये सर्वांत जास्त पोषणतत्वे असतात. तुम्ही अंड्याच्या या सफेद भागात पनीर, टोमॅटो किंवा मशरूमसारख्या भाज्या टाकून एक हाय प्रोटीन ऑमलेट बनवू शकता.

**टोफू –** टोफू बनवण्यासाठी कंडेस्ड सोया मिल्कचा वापर केला जातो. रात्री चार ते पाच टोफूमधील पाणी पूर्णपणे काढून घ्या. एका छोट्या भाड्यांमध्ये थोडे बाल्सामिक व्हिनेगर घ्या त्यामध्ये ओवा आणि लसूण टाका. टोफूवर वरील सर्व मिश्रण टाका आणि रात्रभर तसेच ठेवा. सकाळी बारीक कापलेल्या कांदा, शिमला मिरची तेलामध्ये खरपूस भाजून घ्या आणि त्यात टोफूचे मिश्रण टाका.

**दुधी भोपळा, सफरचंदची स्मूदी –** दुधी भोपळा, सफरचंदची स्मूदी बननण्यासाठी बदामाच्या दुधामध्ये दुधी भोपळा, सफरचंद, दही, बर्फ, मेपल सिरप आणि मीठ टाकून ब्लेंडरमध्ये चांगले ब्लेंड करा.

**पालक ऑमलेट –** सर्वांत आधी कांदा, टोमॅटो, मिर्ची आणि पालक बारीक कापून घ्या. आता एका भाड्यांमध्ये अंड फेटून त्यामध्ये आवश्यकतेनुसार मीठ, कसूरी मेथी, कापलेल्या भाज्या मसाले टाकून चांगले मिक्स करा. या मिश्रणापासून ऑमलेट बनवा.

**ॲवोकाडो टोस्ट –** सर्वांत आधी ब्रेडला टोस्ट करून घ्या त्यानंतर एका छोट्या भांड्यामध्ये एक ॲवोकाडो कापून त्याला चांगल्याप्रकारे मिक्स करून घ्या. आता ब्रेडच्या टोस्टवर सीताफळाचा गर, मीठ, आणि काळी मिरी टाकून हे मिश्रण चांगले एकत्र करून घ्या.

## न व रा त्री चे रं ग



शिवाजीनगर (ता. पनवेल) येथील जरी मरी माता मंदिरात उपस्थित पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत व सहकारी.



### उदे गं अंबे उदे!

**सिंहासनावर विराजमान झालेली उरण येथील सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाची देवी. ही मूर्ती रेखीव असून रंगसंगतीही उत्तम असल्याने विलोभनीय दिसते.**



नवी मुंबई मनपा आयुक्त कार्यालयातील महिलावर्ग



विद्या विकास शाळा, नेरळ, ता. कर्जत




पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त शेलघर येथील गोपाळ भगत यांच्या निवासस्थानी विराजमान देवीचे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शांताबाई भगत यांनी दर्शन घेतले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com